## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ५ यांची जबानी
## मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –

माझे नांव – बालाजी पांडूरंग पिलंगुले,
वय वर्षे – ४७ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. – आलगरवाडी ता. चाकूर जि. लातूर.

**सरकारतर्फे शपथेवर सरतपास – सरकारी अभियोक्ता श्री– तोटेवाड व्ही.बी. यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

**१.** दि. १४.०६.२०२३ रोजी माझ्या कामानिमित्य मी चाकुर पोलीस ठाण्यात गेलो होतो. पोलीसांनी मला त्या दिवशी तुमच्या समक्ष काठया जप्त करावयाच्या आहेत असे सांगून फोन करुन कार्यालयात बोलावून घेतले होते. मधुकर कांबळे यांच्याकडून काठी जप्त केली. ती काठी वेळुची आणि ३६ इंचाची होती. पोलीसांनी माझ्या समक्ष साडे बारा ते एकच्या दरम्यान दुपारी काठी जप्त केली आणि पंचनामा केला. आता मला दि. १४.०६.२०२३ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **नि.क्र. ४८** देण्यात येते.

त्यानंतर कांही वेळाने पोलीसांनी माझ्या समक्ष आणखीन एक काठी एका बाईकडुन अडीच ते तीनच्या दरम्यान जप्त केली. ती काठी वेळुची होती आणि ३७ इंचाची होती. पोलीसांनी माझ्या समक्ष काठी जप्त केली आणि पंचनामा केला. आता मला दि. १४.०६.२०२३ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **नि.क्र.४९** देण्यात येते. ज्या इसमांकडुन काठी जप्त केली, त्या इसमांना पाहील्यास ओळखू शकतो. आज रोजी ते इसम न्यायालयात हजर नाहीत. (आरोपीला त्यांच्या ओळखीचा मुददा उपस्थीत करणार नाही या अटीवर अनुपस्थीत रहाण्याची परवानगी नि.क्र. ४६ वरील अर्जानुसार देण्यात येते.) ज्या काठया माझ्या समक्ष जप्त केल्या, त्या पाहील्यास ओळखू शकतो. आता मला आर्टीकल अ, आणि ब, वरील काठया दाखविण्यात आल्या, त्या माझ्या समक्ष जप्त केलेल्या आहेत.

**सरतपास संपला**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी. वाघमारे यांच्या मार्फत सुरु.**

पोलीसांनी मला जप्ती पंच म्हणून काम करण्यास लेखी नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पोलीस ठाण्यात सतत जाणे येणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व पोलीसांच्या ओळखी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी ब–याच प्रकरणामध्ये जप्ती पंच म्हणून काम केलेले आहे. पंचनामा करतेवेळी तेथे पोलीस कर्मचारी, सज्ञाद आजमखाँ पठाण हे उपस्थीत होते. हे म्हणणे खरे नाही की, या व्यतिरिक्त पोलीस ठाण्यात कोणीही उपस्थीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष काठी जप्तीचा पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नाही. मला आज फिर्यादी भेटलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष श्रवणोत्तर स्वीकृत

DIVYA Digitally signed by DIVYA Date: 2025.07.17 17:05:19 +0530

(श्रीमती दि.सा. करभाजन)

दिनांकः १७/०७/२०२५ न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, चाकूर